# विकासाची नवी पहाट...





***जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान कार्यक्रमातंर्गत संपूर्ण देशभर पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या कामाला प्राधान्य देण्यात आले आहे. ठाणे शहरही त्याला अपवाद राहिलेले नाही. आजमितीस ठाणे शहरामध्ये अंदाजे आठशे कोटी रूपयांचे प्रकल्प मंजूर झाले असून ते प्रकल्प प्रत्यक्षात कार्यान्वितही झाले आहेत. या प्रकल्पांमुळे शहरामध्ये मुलभूत पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण होणार आहे.***

बदलाचे वारे कधी आणि केव्हा सुरू होईल याचा अंदाज वर्तविणे तसे आजच्या घडीला कठीण काम आहे. काही दिवसांपूर्वी माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची चलती होती तर आता जगभर मुलभूत पायाभूत सुविधांचा प्रवाह जोर धरीत आहे. संपूर्ण जगभर आता पायाभूत

सुविधांचा विकास करण्याच्या कामाला प्राधान्य देण्यात आले आहे. किंबहुना मुलभूत पायाभूत सुविधा हा येणा-या काळाचा कळीचा मुद्दा असणार आहे.

भारतात गेल्या काही वर्षांपासून पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या कामाला प्राधान्य देण्यात येत आहे. संपूर्ण देशभर छोट्या-मोठ्या महानगरांमध्ये त्या त्या शहरांची निकड लक्षात घेऊन तिथे पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहेत.

मुलभूत पायाभूत सुविधांचा विकास करण्याच्या कामाला ठाणे महानगरपालिकेने यापूर्वीच प्राधान्य दिले असून या शहराचा पुढील २० वर्षांत कशा पद्धतीने विकास होईल याचा आराखडाच महापालिकेन तयार केला आहे. एकूण ४८८०.६६ कोटी रूपयांचा शहर विकास आराखडा महापालिकेने राज्य शासन आणि केंद्र सरकार यांच्याकडून यापूर्वीच मंजूर करून घेऊन त्यातील काही महत्वाच्या कामाच्या अंमलबजावणीसही सुरूवात केली आहे. यामध्ये प्रामुख्याने भूयारी गटार योजना, रस्ते सुधारणा, पाणी पुरवठा, एकात्मिक नाले विकास, घनकचरा व्यवस्थापन, नागरी वाहतूक पायाभूत व्यवस्था, रिंगरोड, बायपास, ट्रक टर्मिनल्स, दारिद्र्य निर्मूलन योजना आणि सामाजिक सुधारणा आदी महत्वपूर्ण योजनांचा समावेश आहे.

मंजूर विकास आराखड्यातील अनेक महत्वाच्या योजना या सार्वजनिक आणि खाजगी सहभागातून करण्याचे प्रस्तावित आहेत. ज्यामध्ये नागरिक, स्वंयसेवी संस्था आणि खाजगी कंपन्यांचा सहभाग महत्वपूर्ण राहणार आहे तर उर्वरित महत्वाच्या योजना या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियानातंर्गत राबविण्यात येत आहेत.

ठाणे महानगरपालिकेच्यावतीने जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान कार्यक्रमातंर्गत अनेक महत्वकांक्षी प्रकल्प हाती घेतले असून त्यामध्ये अतिरिक्त ११० दशलक्ष लिटर्स पाणी पुरवठा योजना, मलनिःसारण प्रकल्प, एकात्मिक नाले विकास कार्यक्रम, रेल्वे परिसर वाहतूक सुधारणा योजना आणि बीएसयूपी अंतर्गत नागरी गरीबांसाठी घरकुल बांधून देणे आदी प्रकल्पांचा समावेश आहे. या सर्व

प्रकल्पांना राज्य आणि केंद्र शासनाने मंजूरी दिली असून या प्रकल्पांसाठी केंद्र शासनाचे ३५ टक्के, राज्य शासनाचे १५ टक्के आर्थिक अनुदान मिळणार असून उर्वरित ५० टक्के अनुदान महापालिकेच्या माध्यमातून उभे करण्यात येणार आहे.




ठाणे शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून मात्र त्याप्रमाणात मुलभूत पायाभूत सुविधांची वाढ झाली नाही. परिणामी या वाढत्या लोकसंख्येचा बोजा उपलब्ध यंत्रणेवर पडतो. ही बाब लक्षात घेऊन ठाणे महापालिकेने ज्या मुलभूत पायाभूत सुविधा आहेत त्या निर्माण करण्यावर भर दिला आहे. या अंतर्गत अतिरिक्त ११० दशलक्ष लिटर्स पाणी पुरवठा योजनेचा समावेश आहे.

एकूण ७१.१८ कोटी रूपये खर्चाच्या ही योजना तीन वर्षात पूर्ण होणार आहे. ही योजना पूर्ण झाल्यानंतर त्यातून मिळणारे पाणी हे सन २०१५ ते २०१६रोजीच्या लोकसंख्येला पुरेल एवढे असणार आहे. या योजनेतंर्गत भातसा धरणातून पाणी उचलून ते शहाड टेमघर येथून ठाणे शहराला वितरित करण्यात येणार आहे. मलनिःसारण प्रकल्पाच्या बाबतीत बोलायचे झाले तर एकूण तीन टप्प्यात राबविण्यात येणा-या या योजनेला अंदाजे ३३२.२८कोटी रूपये इतका खर्च अपेक्षित आहे सद्यःस्थितीत ठाणे शहराचा मैला वाहून नेणारी यंत्रणा पुरेशी नाही. परिणामी या योजनेमुळे ठाणे शहराला भेडसावणारी मलनिःसारणाची समस्या सुटेल. नाल्यांच्या बाबतीतही

ठाणे महानगरपालिकेने सुमारे २०८.९८ कोटी रूपयांची एकात्मिक नाले बांधणी योजना हाती घेतली आहे. या दोन्हीही योजना तीन वर्षात पूर्ण होणार असून त्यामुळे या शहराच्या मुलभूत समस्या सुटण्यास मदत होणार आहे.



रेल्वे परिसर वाहतूक सुधारण प्रकल्प हा संपूर्ण देशात सर्वप्रथम राबविणारी ठाणे महापालिका ही पहिली महापालिका आहे. आजमितीस रेल्वे स्टेशन येथील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी महत्वपूर्ण ठरणारा हा प्रकल्प महत्वपूर्ण आहे. एकूण २९.३६कोटी रूपये खर्चाचा हा प्रकल्प आहे.

आजमितीस ठाणे रेल्वे स्थानकावरून ५ लाखाच्या आसपास प्रवाशी ये-जा करतात. सन २०३१ साली ही प्रवाशी संख्या २० लाख ३१ हजारावर जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर ही योजना महत्वपूर्ण आहे.

बीएसयूपी हा नागरी गरीबांचे सामाजिक जीवनमान सुधारण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरणार प्रकल्प असून या प्रकल्पातंर्गत एकूण ९४९० घरे बांधण्यात येणार आहेत. या योजनेमुळे शहरी भागातील सर्वसामान्य आणि झोपडपट्टीमधील नागरिकांचे राहणीमान सुधारणार आहेच पण शहरही झोपपट्टीमुक्त होण्यास हातभार लागणार आहे.

एकूणच जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियानातंर्गत राबविण्यात येणा-या सर्व प्रकल्पामुळे देशाच्या नकाशावर ठाणे शहर मुलभूत पायाभूत सोयी-सुविधांनी सज्ज असे शहर दिसणार आहे. अर्थात विकासाची ही नवी पहाट सर्वच ठाणेकरांना सुखावणारी असेल हे सांगण्याची गरज नाही.

------------------------------------------------ XXXXXX ----------------------------------------

## ठाण्याचा लँडमार्क

# ठाणे कला भवन




*ठाणे जिल्हयाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक पाऊलखुणा जपणारं भव्य - दिव्य असं '**ठाणे कला भवन**' शहराच्या मध्यवस्तीत उभं राहिले आहे. संपूर्ण इतिहास आणि कला याबरोबरच वास्तुकलेचा अद्वितीय अविष्कार ठरणा-या आणि अलीकडच्या काळातील लँडमार्क ठरणा-या ठाणे कला भवनविषयी . . . . .*



प्रत्येक शहराची काही वैशिष्ट्य असतात आणि ती वैशिष्ट्य ती ती शहरं जपण्याचा जीवापाड प्रयत्न करीत असतात. ठाणे हे तसं पाहायला गेलं तर तलावांचं शहर म्हणून प्रख्यात. पण तलावांचा अनमोल ठेवा लाभलेल्या या शहराला कालानुरुप अनेक विशेषणं, अनेक बिरुदावल्या प्राप्त होत गेल्या.

इतिहासाचा उज्वल वारसा लाभलेलं तलावांचं शहर, सौर उर्जेचं शहर, सांस्कृतिक उपराजधानीचं शहर. आता या शहराच्या ओळखीला नवी झालर प्राप्त होणार आहे ती ठाणे कला दालनच्या निमित्तानं. ठाण्याचा सांस्कृतिक आणि प्राचीन इतिहासाच्या पाऊलखुणा जागविण्याच्या आणि जपण्याच्या उद्देशातून हे कला भवन ठाणेकरांच्या सेवेत दाखल झाले आहे. निसर्गरम्य परिसरात कापूरबावडी जंक्शन आणि घोडबंदर रस्ता, बाळकुम, ढोकाळी आणि कोलशेत परिसराच्या मध्यवर्ती ठिकाणी एकूण १३४३ चौरस मीटर सुविधा भूखंडावर हे भव्य-दिव्य कला दालन उभं राहिलं आहे.. तळ अधिक तीन मजल्याच्या नाविण्यपूर्ण इमारतीच्या तळ मजल्यावर ठाणे शहराची ऐतिहासिक जडण-घडण, पूर्वीचं ठाणे, आजच ठाणे आणि भविष्यातील या शहराचं चित्र कसं असेल याचा आलेख अनुभवायला मिळणार आहे. देखणं स्वागत कक्ष, दर्शनी भागातील नेत्रदिपक कलात्मक रचना हे या कला भवनच खास वैशिष्ट्य म्हणावं लागेल. या निमित्तानं सर्व ठाणेकर नागरिकांसह इतरांनाही ठाणे शहराचं सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संचित डोळे भरुन पाहण्याची संधी लाभणार आहे.

अतिशय कलात्मक आणि वास्तुकलेचा अजोड नमुना ठरावी अशा पध्दतीने या कला भवनची निर्मिती करण्यात आली असून पहिल्या, दुस-या आणि तिस-या मजल्यावर विविध चित्र प्रदर्शनासाठी सुसज्ज कला दालने व सभागृहाची निर्मिती करण्यात आली आहे. चित्र प्रदर्शनाबरोबरच कलाप्रेमी रसिकांसाठी दुस-या मजल्यावरील कलाविषयक पुस्तकांचं सुसज्ज असं वाचनालय निर्माण करण्यात आलं आहे. या शिवाय प्रत्येक मजल्यावर पॉश प्रसाधनगृह तसेच दोन उद्वाहनेही तैनात करण्यात आली आहेत.

कला रसिकांना भुरळ घालील असंच कला भवनचं बांधकाम करण्यात आलं असून ग्लास कॅलडीग व ऐसीपीमधील भव्य प्रवेशद्वार कला भवनच्या अंतर्गत आणि बाहय कलेच्या दर्जाची प्रचिती देते.

दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृह, राम गणेश गडकरी रंगायतननंतर ठाणे शहराचा लँडमार्क ठरावं असं हे कला भवन ख-या अर्थाने कलाप्रेमींना कलेचा अत्युच्च आनंद देईलच पण त्यापेक्षाही या शहराच्या सांस्कृतिक शिरपेचात मानाचा तुरा खोवेल यात शंकाच नाही.

------------------------------------------------ XXXXXX ---------------------------------------

# विकासाचं ‘निर्मल’ अभियान

*गेल्या काही वर्षांत ठाणे शहराची लोकसंख्या झपाटयानं वाढत आहे हे वास्तव असलं तरी विकासाचा दरही त्या प्रमाणात वाढला आहे हे नाकारता येणार नाही. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियानांतर्गत पायाभूत सोयी-सुविधांनी हे शहर अंतरबाहय बदलणार आहे. निर्मल अभियान हे असंचं एक महत्वकांक्षी अभियान असून यामुळे या शहराच्या आरोग्याचा प्रश्न मार्गी लागेलच पण हागणदारीमुक्त शहराची संकल्पना साकारणारं ठाणे हे महाराष्ट्रातील पहिलं शहर ठरणार आहे*

या विश्वामध्ये काही गोष्टी योगायोगाने घडतात, काही नशीबाने घडतात तर काही गोष्टी खडतर प्रयत्नातून साकारतात. योगायोगाने किंवा नशीबाने घडणा-या गोष्टींचा बाऊ करण्याचं काहीच कारण नाही. पण खडतर प्रयत्नांमधून जेव्हा काही महत्वकांक्षी प्रकल्प सत्यात उतरतात, ज्या प्रकल्पांमुळे एखाद्या शहराचं राहणीमान उंचाऊ शकतं, समस्यांचं निराकरण होऊ शकतं आणि शहराचा अंतरबाहय चेहरा बदलू शकतो तेव्हा त्या प्रकल्पांमागचे प्रयत्न निश्चितपणे अधोरेखित करणे गरजेचे असते.

सध्या ठाणे शहरामध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियानातंर्गत एकात्मिक नाला विकास, भुयारी गटार योजना, पाणी पुरवठा योजना, रेल्वे स्टेशन परिसर वाहतुक सुधारणा प्रकल्प आदी महत्वाचे प्रकल्प येत्या काही महिन्यांत पूर्णत्वाला जातील. बीएसयुपी या महत्वकांक्षी प्रकल्पालाही स्थायी समितीने नुकतीच मान्यता दिली आहे. यामुळे या शहराचा अंतरबाहय चेहरा बदलणार आहे. विकासाचा एक पारदर्शक चेहरा नागरिकांना पाहावयास मिळणार आहे.

यातच भरीसभर म्हणून महापालिकेच्या इतिहासात आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्याही इतिहासात पहिल्यांदाच महानगर आयुक्त श्री. रत्नाकर गायकवाड यांनी ठाणे महानगरपालिकेला भेट देऊन अजून काही महत्वकांक्षी प्रकल्पांचा नजराना पेश केला आहे. उड्डाण पूल, रस्ते, शाई धरण, आरोग्य सुविधा, अग्निशमन दल आणि शिक्षण या सर्व पातळयांवर त्यांनी मुलभूत सहकार्य देण्याचे मान्य केले आहे. त्याचबरोबर या शहराला हागणदारीमुक्तीचा संदेश देणारा महत्वकांक्षी प्रकल्प राबविण्याचा मुलमंत्र ही दिला. त्याच्यामुळेच 'निर्मल अभियान' सारखा अतिशय चांगला प्रकल्प अनुदान स्वरुपात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठाणे शहरासाठी मंजूर केला आहे.

दिवसेंदिवस वाढत्या नागरीकरणामुळे देशातील सर्वच शहरांचे बकालपण कमीअधिक प्रमाणात वाढत चालले आहे. ठाणे ही त्यास अपवाद नाही. सद्यस्थितीत या शहराची लोकसंख्या अंदाजे १६ ते लाखाच्या घरात आहे. २०११ साली ती १९ लाखाचा आकडा पार करेल. २०२१ साली २६ लाख, २०३१ साली ३३ लाख आणि २०४१ साली ही लोकसंख्या ४१.७३ म्हणजे जवळजवळ ४२ लाखाचा आकडा पार करेल.

या लोकसंख्येच्या प्रमाणात झोपडपट्टीचं प्रमाणही वाढत जाणार आहे. २००१ साली शहरातील झोपडपट्टयांचं प्रमाण ३३.२ टक्के होत. २००५ साली ते ३५.५ टक्क्यांवर पोहचलं. आज त्याचं प्रमाण अजूनही वाढलेलं असेल यात शंकाच नाही.

या पार्श्वभूमीवर या वस्तीमध्ये साधारणतः जे महत्वाचे प्रश्न असतात ते म्हणजे शौचालय, पाणी आणि गटार. पण शौचालयांचा प्रश्न हा नेहमीच ऐरणीवर असलेला प्रश्न. परिणामी झोपडपट्टी परिसर हा हागणदारीयुक्त परिसन बनतो. सद्यस्थितीत ठाणे शहरामध्ये एकूण ८६४ युनिटस् शौचालये आहेत तर ८७१५ सीटस् आहेत. झोपडपट्टीचं प्रमाण बघता हे प्रमाण अगदिचं नगण्य आहे. यामध्ये काही शौचालये सार्वजनिक ठिकाणीही आहेत. परंतू या शहराच्या तुलनेने सद्यस्थिती मध्ये शहरामध्ये एकूण ४० व्यक्तीमागे एक सीट म्हटले तरी १४६२४ सीटस्ची आवश्यकता आहे. उपलब्ध सीटस् आणि आवश्यक असलेले सीटस् यामध्ये साधारणतः ९ हजार सीटस्चा फरक आहे. नेमका हा फरक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अनुदानित केलेल्या 'निर्मल अभियान' प्रकल्पातंर्गत मिटवून टाकण्यात येणार आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ७९५० सीटस्च्या महापालिकेच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. म्हणजेच एकूण ८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मान्यता दिली आहे. अनुदान तत्वावर एवढया मोठया प्रमाणावर प्रकल्प राबविणारी ठाणे महानगरपालिका ही राज्यातील पहिली महानगरपालिका असावी. किंबहुना हागणदारीमुक्त शहराची संकल्पना प्रत्यक्षात राबविणारी ठाणे महानगरपालिका ही राज्यातील एकमेव महापालिका असावी.

---------------------------------------------- XXXXXX ----------------------------------------